# भारतातील शेती व शेतकऱ्याविषयी महात्मा फुले यांचे विचार

**डॉ. प्रशांत काशिनाथ लभाने**
सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग
संतोष भीमराव पाटील कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय मंद्रूप, जिल्हा सोलापूर
Email- labhaneprashant@gmail.com

---

**सारांश :**

*महाराष्ट्रातील समाजसुधारकांच्या पहिल्या पिढीतील श्रेष्ठ समाज सुधारक आणि विशेषतः समाजातील श्रमजीवी वर्गाच्या शोषणाची व सामाजिक दाशाची मीमांशा करणारे क्रांतिकारक विचारवंत म्हणजे महात्मा फुले होय. भारतातील परंपरागत समाज संस्थांच्या विरुद्ध बंड करणारे पहिले बंडखोर, भारतीय स्त्री शिक्षणाचे जनक, स्त्री स्वातंत्र्याचे आणि हक्काची उदगाते शेतकरी कामकरी यांची चळवळ उभारणारे पहिले पुढारी म्हणून ज्योतिराव गोविंदराव फुले ख्याती प्राप्त ठरले आहेत. चार्वक, गौतम बुद्ध, संत कबीर, संत तुकाराम, शिवाजी महाराज यांची परंपरा जोपासणारे विवेकवादी होते शेतकरी हा संपूर्ण समाज व्यवस्थेचा कणा आहे पण तोच अज्ञान अंधश्रद्धाच्या भारांनी वाकला आहे. 1875 साली अहमदाबाद, पुणे,सातारा, सोलापूर इत्यादी ठिकाणी शेतकऱ्यांनी बंड केली शेतकरी व सावकार यांची संबंध बिघडल्याने दंगे झाले भवितव्य कठीण दिसू लागले सावकार लोक शेतकऱ्यांना कर्ज देताना दिलेल्या रकमेपेक्षा अधिक रकमेचा दस्तावेज करून घेत ही ठगबाजी लोकांनी पचू दिली नाही अनेक वेळा ओरड केली सरकारने चौकशी मंडळ नेमले. या मंडळाच्या सूचनेप्रमाणे डेक्कन एग्रीकल्चरीस्ट रिलीफ ॲप सरकारने संमत केला सावकार व शेतकरी यांचे संबंध सुधारावे या उद्देशाने या ऍक्ट मध्ये अनेक निर्बंध घातले खतपत्रे प्रामाणिक असावी शेतकऱ्यांची हक्काचे रक्षण व्हावे याकरिता तरतुदी होत्या. जोतीरावांचे 'दिनबंधू' नावाचे साप्ताहिक होते त्याने ही निर्बंध उचलून धरले शेतकऱ्यांच्या जमिनीत सावकाराने धक्का लागू नये असे निर्बंध सरकारने घातले होते अशिक्षितपणा व अज्ञान यामुळे शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये म्हणून महात्मा फुले यांनी शिक्षणावर भर देण्यासाठी प्रयत्न केला.*

**कळ शब्द :** महात्मा फुले, शेतकऱ्यांना, असूड, शेती, समाजसुधारक

---

**प्रस्तावना :**

महात्मा ज्योतिराव फुले यांच्यावर जगप्रसिद्ध विचारवंत थॉमस पेन यांचा प्रभाव होता विद्यार्थी दशेतच The Rights of Man हा ग्रंथ वाचला होता त्यांच्या विचारांचा महात्मा फुले यांच्यावर इतका प्रभाव पडला की त्यांनी उर्वरित आयुष्य मानवी स्वातंत्र्यासाठी वाहिले महात्मा फुले यांच्यावर निसर्गवादी विचारसरणीचा प्रभाव पडला होता कबीरांच्या बीजक ग्रंथातील विप्रमती या प्रकरणाचा त्यांच्या विचारसरणी प्रभाव पडला. महात्मा ज्योतिराव फुले यांनी आपल्या विचारांचा एक सुबोध व सुंदर असा सूत्रबद्ध सारांश सांगितला.

"विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली

नीतीविना गती गेली! गतीविना वित्त गेले

वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले ”

शेतकऱ्याचा असूड या ग्रंथात त्यांनी हे विचार व्यक्त केले होते अज्ञान, अंधश्रद्धा पुनर्जन्म, स्वर्ग-नरक, रूढी-परंपरा या सर्व कल्पना मानवाला दास्य श्रृंखलात बद्ध करून टाकणाऱ्या आहेत भोळ्या भावड्या लोकांच्या मनावर या कल्पनांची गारुड केले होते त्यांची विचारशक्ती मरून गेली होती त्यांच्यातील नवनिर्माण शक्तीचा रास झाला होता त्या सर्वांवर एकच पर्याय होता तो म्हणजे शिक्षणाचा!

महात्मा ज्योतिराव फुलेंचा उदरनिर्वाहासाठी बांधकाम  कंत्राटदाराचा व्यवसाय होता त्यामुळे त्यांनी गरीब कामगार मजुरांच्या जीवनाचा जवळून अभ्यास केला मजुरांची व शिक्षणाशिवाय शेतकऱ्यांची स्थिती सुधारणार नाही अशा त्यांनी सूचना केल्या ब्रिटिशांचे राज्य गेले तर पुन्हा पेशवाई येईल याची त्यांना धास्ती वाटत होती त्यामुळे 1857 चे स्वातंत्र्यसमोर फसले याचा त्यांना आनंद वाटला शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी लढणारे महाराष्ट्रातील फुले पहिले समाजसुधारक होते ज्योतिरावांनी लोकशिक्षणाला महत्त्व दिले जुलमी सावकारी विरुद्ध लढा देण्यासाठी पुणे व नगर जिल्ह्यात त्यांनी शेतकऱ्यांचे बंड घडवून आणले हे बंड खतफोडीचे बंड या नावाने प्रसिद्ध आहे जुन्नर तालुक्यात त्यांनी शेतकऱ्यांचा पहिला असहकार घडविला. भारतातील कृषी प्रधान अर्थव्यवस्थेमुळे बहुसंख्य समाज हा शेतीवर आपली गुजरान करतो. शेतीमधील काबाडकष्टाची कामे करूनही पदरी काहीच पडत नाही ही शेतकऱ्यांची वास्तविक परिस्थिती होती शेतकऱ्यांचा आसूड मध्ये फुलांनी शेतकऱ्यांच्या हालाखीची अनेक कारणे सांगितली  आहेत आळसावलेल्या बैलावर आसूडाचे (चाबूक ) प्रहार केल्याशिवाय बैल वटनेवर येत नाही त्याचप्रमाणे शूद्रांचे शोषण करणाऱ्यावर आसोडाचे प्रहार झाले पाहिजेत अशी महात्मा फुल्यांची भूमिका होती शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांना लुबाडणाऱ्या ऐशोरामात राहणाऱ्या उच्च वर्णीयांना या आसूडांचा  प्रसाद मिळाला पाहिजे. अन्यायाविरुद्ध पेटून उठण्याची प्रेरणात महात्मा फुल्यांनी यातून दिली आहे शोषित शुद्रांना जागृत करण्याच्या प्रयत्नातून या ग्रंथाची निर्मिती झाली आहे कुटुंबातील असल्यामुळे त्यांना शेतकऱ्यांच्या प्रश्नांची चांगली जाण होती शेतकऱ्यांचे अनेक मार्गाने होणारे शोषण त्यांना व्यथीत  करीत असे त्यासाठी त्यांनी शेतकऱ्यांच्या समस्यांचा गांभीर्याने विचार केला. त्या मागील कारणाचा शोध घेतला  व त्यावरील उपाययोजनाही सांगितल्या.

**शोध निबंधाची उद्दिष्टे :**

1) महात्मा फुले यांच्या दृष्टिकोनातून  शेतकऱ्यांच्या परिस्थितीचा आढावा घेणे.

2) महात्मा फुलेच्या दृष्टिकोनातून शेती क्षेत्राची स्थिती जाणून घेणे

**संशोधन पद्धती :**

दुय्यम साधनसामग्रीचा वापर करण्यात आला आहे यात प्रकाशित पुस्तके,अहवाल वेबसाईट प्रकाशित लेख

**शेती व शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यासाठी उपाय योजना :**

महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यासाठी शेतकरी वर्गाला शिक्षण देणे हा फार आवश्यक आहे असे प्रतिपादन केले कारण शेतकरी हा निरक्षर  असल्यामुळे त्यांची सावकार, सरकारी अधिकारी आणि सवर्ण या तिन्ही वर्गापासून फसवणूक होत होती त्यामुळे त्यांना प्रथम विद्या ज्ञान  देणे फार महत्त्वाचे आहे कारण विद्ये

शिवाय बुद्धीचा उपयोग होत नाही ज्ञानाशिवा शक्ती नाही, ज्ञान ही फार महान शक्ती आहे. म्हणजे ज्ञानाशिवाय व्यक्ती पशु बनतो. शेतकरी अज्ञानी अशिक्षित असल्यामुळेच त्यांचे व त्यांच्या कुटुंबाचे विविध स्तरावर शोषण होते हे कमी करण्यासाठी स्त्रियांना व कनिष्ठ समाजातील समाजाला शिक्षण द्यावे असे फुल्यांनी स्पष्टपणे सांगितले शेतकरी वर्गांना व त्यांच्या अपत्यांना शिक्षण देण्यासाठी काही पुढील उपाय सांगितले.

1) ग्रामीण भागात इंग्रजी शाळा सुरू आहेत त्या बंद कराव्यात
2) कनिष्ठ वर्गातील शिक्षकांचीच निवड करावी कारण त्या शिक्षकाला त्याची जाण असते व तो आपली मुले समजून त्यांना शिकवील.
3) मुलांसाठी वस्तीगृह काढावीत व शेतकऱ्यांच्या मुलांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण द्यावे.
4) गरीब वर्गातील मुलांना पाट्या, पुस्तके, वही,पेन मोफत द्यावेत.
5) कनिष्ठ समाजातील किंवा वर्गातील शिक्षकाला प्रशिक्षण द्यावे

शेतीची उत्पादकता वाढावी शेतकऱ्यांची उत्पन्न वाढवावे शेती सुधारण्यासाठी उपाययोजना सांगितली आहे.

**1) शेतीसाठी पाणीपुरवठा योग्य रीतीने करावा** :

भारतीय शेती कोरडवाहू आहे निसर्गाच्या लहरीवर भारतीय शेती अवलंबून आहे त्यामुळे महात्मा फुले म्हणतात की ब्रिटिश सरकारने काळ्या व गोऱ्या लष्करातील पोलीस खात्यातील शिपायाकडून जागोजागी तलाव, बंधारे अशाप्रकारे बांधावेत की वळणाचे पाणी एकंदर शेतात मुरून नंतर नदी नाल्यात मिसळले जावे असे केल्याने शेती सुपीक होईल.महात्मा फुले यांनी शेतीसाठी सिंचन व्यवस्था महत्त्वाची मानली आहे कारण भारतीय शेती टेकड्या पायथ्याशी आहे त्यामुळे टेकड्यावर नद्या धरणे बांधावीत. नदीचे पाणी विहिरीत साठवून फळबागांसाठी आणि शेतीसाठी त्याचा उपयोग करावा.

**2) शेतकरी वर्गाच्या मुलांना शेतीविषयक शिक्षण देणे :**

भारतातील शेतीची सुधारणा करण्यासाठी आणि शेतकरी वर्गाचे शोषण होऊ न देण्यासाठी शेतकरी वर्गांना शेतीविषयक शिक्षण देणे फार महत्त्वाचे आहे त्याचबरोबर त्यांच्या मुलांना शेतीविषयक शिक्षण देणे. कारण या शिक्षणामुळे शेती उत्पादनाच्या बाबतीत त्यांना पूर्ण ज्ञान प्राप्त होईल आणि शेतीही ते व्यावसायिक दृष्टीने करतील.

**3) नवीन ज्ञानाचा वापर :**

भारतीय शेतीची उत्पादकता वाढवण्यासाठी प्रगत देशात शेतकरी शेतीसाठी जे तंत्रज्ञान वापरतात त्याचा भारतीय शेतकरी वर्गाला शासनाने त्याचा फायदा करून द्यावा.तसेच शेतकऱ्यांना कृषीविषयक शिक्षण व प्रशिक्षण द्यावे कोणत्या शेतजमिनीत कोणती पिके घ्यावी याचे मार्गदर्शन करावे इतर देशात शेती विषयक नियतकालिके व माहिती प्रसारित होते ती भारतीय शेतकऱ्यांना उपलब्ध करून द्यावी त्याचा आपल्या शेतीमध्ये शेतकऱ्यांना प्रयोग करता यावा यासाठी सर्व शेतकऱ्यांना शिक्षण देऊन किंवा साक्षर करावे.

**4) सरकारचे प्रोत्साहन :**

आपल्या देशातील जे लोक शेती क्षेत्राचा विकास करत असतील तर त्यांना सरकारने प्रोत्साहन द्यावे भारतातील शेती ही कोरडवाहू आहे पण भारतातील शेतीची सुधारणा व्हावी यासाठी महात्मा फुल्यांनी असे प्रतिपादन केले की जे शेतकरी सरकारी मदतीशिवाय मार्गदर्शनाशिवाय विहिरी खोदत असतील त्यांना उत्तेजनार्थ

काही बक्षीस द्यावीत हे विचार दुसऱ्या शब्दात म्हणजे आज शासन शेतकऱ्यांसाठी ज्या योजना राबवीत आहे त्यामध्ये विहिरी खोदण्यासाठी सरकार शेतकऱ्याला आर्थिक अनुदान देत आहे.

**5) पाण्याची योग्य वाटप करावे :**

भारतातील नद्यावर धरणे बांधून कालवे निर्माण करण्यासाठी सरकारने मोठे कर्ज उभारले तसेच ब्रिटिश अधिकाऱ्यांना जास्तीचे पगार दिले या कर्जाचा भार भारतीय अर्थशास्त्रीय पडला आहे धरणातून पाण्याची जी वाटप केले जात होते ते योग्य पद्धतीने होत नाही पाणी वाटपात नियोजनाचा अभावाचे पाण्याचे न्याय वाटप करण्यासाठी फुलांनी उपाय सुचले त्यांच्या मते शेतीच्या आकारमानाचा विचार करून सरकारने प्रत्येक शेतकऱ्याला पाण्याची तोटी बसवून द्यावी त्यातून हवे तेवढेच पाणी शेतकरी घेतील त्यामुळे पाणी सोडण्यासाठी कर्मचाऱ्यांची गरज भासणार नाही आणि तो खर्च वाचेल

**6) गाळ व खते मोफत द्यावी :**

भारतामध्ये विहिरी खोदत असताना व विहिरी बांधून करणाऱ्या शूद्र शेतकऱ्यांस लहान-मोठी बक्षीस सरकारकडून देण्याची वहिवाट घालावी व एकंदर सर्व नदी नाले व तलावातील साचलेला गाळ पूर्वीप्रमाणे शेतकऱ्यास फुकट देऊ द्यावा व त्या गावची गायराने सरकारच्या मालकीची कुरणे जरावं जनावरांना चारण्यासाठी शेतकऱ्यांना खुली करून द्यावीत बियाणांचा व अवजारांचा वापर करणे नव्या तंत्रज्ञानाचा शेती उत्पादन आणि इत्यादी गोष्टीवर महात्मा फुले यांनी जोर दिला आहे

**7) कृषीवर आधारित उद्योगांची निर्मिती :**

भारतात शेतमालांवर प्रक्रिया करणारे उद्योग फारसे विकसित होऊ शकले नाहीत त्यातच इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतीमुळे यंत्राचा वापर वाढला तांत्रिक ज्ञानात सुधारणा झाली वस्तूचा उत्पादन खर्च कमी झाला भारतातील कच्चा माल इंग्लंडमध्ये पाठवून पक्क्या मालांत रूपांतर करून तो भारतात आणून विकला जातो. भारतीय वस्तूची मागणी त्यामुळे एकदम घटली जे काही थोडे उद्योग देशात कार्यान्वित होते ते बंद पडले यावर उपाय म्हणजे भारतातच आधुनिक तंत्रज्ञान व यंत्र याचा वापर करून कृषी मालावर प्रक्रिया करणारे उद्योग स्थापन करावेत.

**निष्कर्ष :**

महात्मा ज्योतिराव फुले यांनी भारतीय शेतकऱ्यांची असलेली दैनिक अवस्था,दारिद्र्यपण, अशिक्षितपणा याचा आढावा घेऊन यासाठी जबाबदार व्यक्तीची विस्तृत विवेचन त्यांनी केले. या शेतकऱ्यांच्या व शेतीच्या क्षेत्रात सुधारणा करण्याकरिता काय उपाययोजना करायला पाहिजे त्याविषयी विस्तृत उपाय सांगितले जेणेकरून भारतीय शेतकऱ्यांच्या व शेतीच्या सुधारणा होईल महात्मा फुल्यांनी एवढे प्रयत्न करूनही शेती व शेतकऱ्यांच्या परिस्थितीत सुधारणा झालेली दिसून येत नाही. भारतात दुसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून शेती क्षेत्राकडे लक्ष देऊन सुद्धा शेती क्षेत्रामध्ये व शेतकऱ्यांच्या परिस्थितीत अजूनही सुधारणा झालेली दिसून येत नाही शेती क्षेत्र अर्थव्यवस्थेचा कणा आहे अर्थव्यवस्थेचा विकास साधायचा असेल तर या क्षेत्राचा विकास होणे आवश्यक आहे त्याकरीता शासनाने विशेष लक्ष देऊन कृषी क्षेत्राचा विकास व शेतकऱ्यांच्या स्थिती सुधारणा करावी.

**संदर्भग्रंथ :**

- गुलामगिरी
- शेतकऱ्याचा असूड
- तृतीय रत्न
- सार्वजनिक सत्य धर्म
- पाटील पी एस (१९८४ दुतीय आवुर्ती ) महात्मा जोतीराव फुले : विस्तृत परिचय,महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ,मुंबई
- खंदारे एस एम, भारतीय आर्थिक विचारवंत,कैलाश पब्लिकेशन,२०१६, औरंगाबाद